# मनोगत

१५ जूनचा स्वामीजींच्या वाढदिवसाचा कार्यक्रम नंतर गुरू पौर्णिमेचा परिज्ञान छाया मध्ये उत्साहात पार पडला. स्वामीजींची पुण्यतिथी मात्र श्रीयुत हेमंत कुमठाकर यांच्या ठाण्याच्या घरी संपन्न झाली. आपल्या धार्मिक सणांची रेलचेल असलेला श्रावण महिना संपला, गणेशोत्सव, पितृपक्ष तसेच नवरात्र ही सरली. आता वाट पाहू या आपल्या सगळ्यात मोठ्या सणाची म्हणजे दसरा-दिवाळीची.

आई वडिलांचे आई वडील होता आले पाहिजे!
एक दिवस येतो आणि दोघांपैकी एकाला घेऊन जातो
जो जातो तो सुटतो, परीक्षा असते मागे राहणाऱ्याची

कोण अगोदर जाणार? कोण नंतर जाणार हे तर भगवंतालाच माहीत जो मागे रहातो त्याला आठवणी येणं, अश्रू येणं हे अगदी स्वाभाविक असतं! आता प्रश्न असा असतो की ही आसवं, हे रडणं थांबवायचं कुणी ? मागे राहिलेल्या आईला किंवा वडिलांना कुणी जवळ घ्यायचं ? त्यांच्या पाठीवरून हात कुणी फिरवायचा? निश्चितपणे ही जवाबदारी असते मुलांची, मुलींची, सुनांची ....

थोडक्यात काय तर दोघांपैकी एकजण गेल्यानंतर मुलामुलींनाच आपल्या आई वडिलांचे आईवडिल होता आलं पाहिजे ! लक्षात ठेवा लहानपणी आई वडिलांनी नेहमी अश्रू पुसलेले असतात, आजारपणात अनेक रात्री जागून काढलेल्या असतात, स्वतः उपाशी राहून, काहीबाही खाऊन आपल्याला आवडीचे घास भरवलेले असतात. परवडत नसलेली खेळणी आणि आवडीचे कपडे घेतलेले असतात. म्हणून आता ही आपली जवाबदारी असते, त्यांच्या सारखच निस्वार्थ प्रेम करण्याची. असं झालं तरच ते सुखाने जगू शकतील. नाहीतर 'तो माणूस म्हणजे वडील' किंवा 'ती स्त्री म्हणजे आई 'तुटून जाऊ शकतात, कोलमडून पडू शकतात ! आणि ही जवाबदारी फक्त मुलं, मुली आणि सुना यांचीच असते असे नाही, तर ती जवाबदारी प्रत्येक नातेवाईकाची, परिचिताची, मित्र मैत्रिणींची .......सर्वांची असते!

फक्त छत, जेवणखाणं आणि सुविधा देऊन ही जबाबदारी संपत नाही तर अशा व्यक्तींना आपल्याला वेळ आणि प्रेम द्यावेच लागेल तरंच ही माणसं समाधानाने जगू शकतील! आयुष्याचा जोडीदार गमावणं म्हणजे नेमकं काय ? हे दुःख शब्दांच्या आणि अश्रूंच्या खूप खूप पलीकडचं असतं ......म्हणून अशा व्यक्तींना समजून घ्या! त्यांच्या अपेक्षा फार नसतात, केवळ माया, प्रेम आणि आपुलकीचे दोन गोड शब्द एवढीच त्यांची अपेक्षा असते ती जरूर पूर्ण करा. त्यांच्या जागी आपण आहोत अशी कल्पना करा आणि त्यांना वेळ द्या !

उद्या हा प्रसंग कोणावरही येऊ शकतो म्हणून नेहमी अशांशी प्रेमाने,मायेने आणि आपुलकीने वागा! शेवटी दोन शब्द परिज्ञान छाया बद्दल. इथली ज्येष्ठ नागरिकांची संख्या हळूहळू वाढत आहे. आता ती तेरावर पोहोचली आहे. स्वामीजींच्या कृपेने आपल्या समाजातून तसेच बाहेरूनही वेगवेगळ्या स्वरुपात आर्थिक मदत येतच असते. त्या सर्वांचे मनापासून आभार.
जय परिज्ञान !

❑ ❑ ❑

# आशीर्वचन

## नववे गुरू स्वामी आनंदाश्रम (क्रमशः)

भगवान श्रीकृष्णाने भगवद्गीतेत वर्णन केल्याप्रमाणे आपल्या भारत वर्षाच्या इतिहासात असलेच पुष्कळ प्रसंग आलेले दिसतात. जेंव्हा जेंव्हा धर्माची अवनती होते तेंव्हा तेंव्हा परमेश्वर अंशांवताराने अथवा पूर्णावतार या पृथ्वीवर प्रकट होऊन आपल्या भक्तांच्या उद्धारार्थ आणि धर्माचे कार्य करण्यास गौतम बुद्ध, श्री शंकराचार्य, श्री रामकृष्ण परमहंस वगैरे विभूती उदाहरणावरून हेच स्पष्ट होते. अशा महान विभूती या जगामधे वेळोवेळी अवतार घेऊन स्वतःच्या सत्शील वर्तनाने व मोठमोठी कार्ये करून अथवा करवून भक्तजनांस धर्ममार्गास लावतात व इतरांचाही उद्धार करतात इतकेच नव्हे तर 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन:' या न्यायाने जगामध्ये कसे विधेयवृत्तीने वागावे व परोपकारबुद्धीने इतरांच्या उपयोगी पडावे हे स्वतः आत्मचरित्रावरून दाखवून देतात व सर्वांना सन्मार्गास लावतात.

आमच्या चित्रापूर मठाच्या इतिहासाने व तेथील श्रीगुरूपरंपरेने आजतागायत केलेले कार्य यांचे सूक्ष्म रीतीने निरीक्षण केल्यास दूरदूर पसरलेल्या सारस्वत समाजातील लोकांना धार्मिक तथा आध्यात्मिक तसेच सामाजिक मार्गदर्शन देऊन समाजाची कशी सुसंघटना केली व अभिवृद्धीचा मार्ग कसा दाखविला हे स्पष्ट समजते.

हेच उद्दिष्ट साधण्यास इष्टदेव श्री भवानीशंकराच्या प्रेरणेने आमच्या पूर्वीच्या गुरुस्वामींनी योग्य वेळ आली आहे असे जाणून शिष्यस्वीकार करून आम्हां भक्तजनांस कृतार्थ केले व परमपूज्य गुरूंच्या आदेशानुसार श्री आनंदाश्रम स्वामीजींनी धर्मजागृती व धर्माप्रचार करण्याचे महत्त्वाचे कार्य अंगीकारले. आपले हे कार्य करताना त्यांना किती अडचणी आल्या व त्यांना किती कष्ट भोगावे लागले व संन्यासाश्रम घेतल्यानंतर त्यांचा आयुष्यक्रम किती कष्टमय झाला हे सांगण्याची जरूरी नाही, असे असतानाही सर्व संकटांना धैर्याने तोंड देऊन कोणत्याही अडचणींना न जुमानता मठाची सर्वतोमुखी अभिवृद्धी तथाच सारस्वत समाजाची धार्मिकरीत्या सुधारणा, सुसंघटना व भक्तजनांचा उध्दार तसेच मठ व शिष्यवर्ग यांचे मधील हितसंबंध घनिष्ठ करणे हेच ध्येय पुढे ठेऊन मठाधिपती व धर्माधिकारी या नात्याने आपले अंगीकृत कार्य सिद्धीस नेले व वेळोवेळी पूर्णांशाने मार्गदर्शन देऊन शिष्यवर्गास उपकृत केले. यास्तव अखिल सारस्वत समाज श्री स्वामीजींच्या चरणी सदैव ऋणी राहील. आपले उद्दिष्ट अंगीकृत कार्य सुगम रीतीने साध्य करून घेण्याच्या कामी श्रीगुरूस्वामींचे दिव्य तपशील, विशाल दृष्टी, कठोर कर्तव्यनिष्ठा, कार्यतत्परता, सुसंघटना सामर्थ्य व प्रेरणास्थान तसेच स्फूर्तिदायक मार्गदर्शन, परम सहिष्णुता, स्वकीय व परकीयांविषयी समत्वबुध्दी व कनवाळुवृत्ती, अनुगामीयांच्या तथा परिजनांच्या योगक्षेमासाठी व सुखसमाधानासाठी निर्लोभ त्यागवृत्ती व क्षमाशील आचरण व त्यांच्या विषयींचे प्रेमळ व दयार्द्र अंतःकरण शिष्य वर्षावरील अगाढ प्रेम व त्यांच्या ऐहिक व पारलौकिक अभिवृद्धीसाठी आत्मार्पण तसेच सारस्वत समाज सुसंघटित करण्याची अतीव उत्कंठा व कळकळ हीच कारणीभूत झाली आहेत असे म्हणणे यथोचित होईल.

❑ ❑ ❑

# IN QUEST OF GOD - TIRUPATI

ONE early morning at about 4 a.m., descending from the mountain, Ramdas walked straight to the railway station, and finding a train waiting, got on to the platform without being obstructed, and entered a compartment. A few minutes later the train moved. Where was the train taking him? It was none of his concern to try to know this. Ram never errs and a complete trust in Him means full security and the best guidance. The train ran up to the Katpadi junction. Here, Ram brought him in touch with a Sadhuram to guide him. He promised to take him to Tirupati, in which direction the train was running. O Ram, Thy plans are, indeed, always mysteriously worked out. The new Sadhuram and he travelled together, and in due course both alighted at the Tirupati station. After refreshing themselves with some food prepared by the kind-hearted Sadhuram, they directed their steps towards the Tirupati hill. Both commenced ascending the stone steps of the hill. It was climbing 'higher still and higher up the mount of glory!' About 700 steps were covered and the Sadhus reached the top of the hill at about 8 in the evening. Then, they had to walk about three miles over almost level ground. It was a moonlit night but the cold up there was intense, while, at the same time, Ram's grace was correspondingly very great. A little before midnight the temple of Balaji was reached. At the entrance to the temple was a fire, around which a number of people were sitting.

The shivering Sadhus hastened to the spot, pressed themselves in among these friends and warmed their hands and feet. Ram was indeed kind! A short time later, the doorkeeper of the temple commanded all at the fire to leave the place and get out since it was time to close the main door of the temple. So, all had to give up the fireside most reluctantly. The Sadhuram requested the watchman to permit himself and Ramdas to spend the night inside the temple, which request was not granted. It was all Ram's will. To come out of the temple meant complete exposure to the strong and extremely cold breeze blowing over the hills. It was dark now and they had to search out a place to rest for the night.

There were some massive buildings Dharmashalas -all open. However, the Sadhus scrambled into one of these and settled themselves down. The Sadhuram began to grumble at the cold, and said : 'Swami, it is impossible to think of sleep for the night. The cold will not allow us a wink of sleep'. 'So much the better,' replied Ramdas. 'All the time can then be devoted to Rambhajan - the Bhajan of that All-powerful and All-loving Being.' 'That is all right for you,' remarked the Sadhuram, 'but I should suggest a move from this place as soon as the day breaks. One more night in this plight shall certainly stiffen us into sheer logs of wood.'Receiving no reply from Ramdas who was then engaged in the meditation of Ram, the Sadhuram laid himself down, and twisted himself into the shape of the figure 8, at the same time, covering his body with a thin cotton cloth, the only spare cloth he had. This cloth was too small to fully cover him in spite of his assuming a position, in which his bent knees were drawn up to touch his very nose.

❑ ❑ ❑

## MAYA AND FREEDOM – 1

(Lecture delivered by **"SWAMI VIVEKANANDA"** in London)

In one form or another, we are all in it. It is a most difficult and intricate state of things to understand. It has been preached in every country, taught everywhere, but only believed in by a few, because until we get the experiences ourselves we cannot believe in it. What does it show? Something very terrible. For it is all futile. Time, the avenger of everything, comes, and nothing is left. He swallows up the saint and the csinner, the king and the peasant, the beautiful and the ugly; he leaves nothing. Everything is rushing towards that one goal destruction. Our knowledge, our arts, our sciences, everything is rushing towards it. None can stem the tide, none can hold it back for a minute.

We may try to forget it, in the same way that persons in a plague-striker city try to create oblivion by drinking, dancing, and other vain attempts, and so becoming paralyzed. So we are trying to forget, trying to create oblivion by all sorts of sense pleasures. And this is Maya. Two ways have been proposed. One method, which everyone knows, is very common, and that is: " It may be very true, but do not think of it. ' Make hay while the sun shines,' as the proverb says. It is all true, it is a fact, but don't mind it. Seize the few pleasures you can, do what little you can, do not look at tile dark side of the picture, but always towards the hopeful, the positive side." There is some truth in this, but there is also a danger. The truth is that it is a good motive power. Hope and a positive ideal are very good motive powers for our lives, but there is a certain danger in them. The danger lies in our giving up the struggle in despair.

Such is the case with those who preach, & quot; Take the world as it is, sit down as calmly and comfortably as you can and be contented with all these miseries. When you receive blows, say they are not blows but flowers; and when you are driven about like slaves, say that you are free. Day and night tell lies to others and to your own souls, because that is the only way to live happily." This is what is called

practical wisdom, and never was it more prevalent in the world than in this nineteenth century; because never were harder blows hit than at the present time, never was competition keener, never were men so cruel to their fellow-men as now; and, therefore, this consolation must be offered. It is put forward in the strongest way at the present time; but it fails, as it always must fail. We cannot hide a carrion with roses; it is impossible. It would not avail long; for soon the roses would fade, and the carrion would be worse than ever before. So with our lives. We may try to cover our old and festering sores with cloth of gold, but there comes a day when the cloth of gold is removed, and the sore in all its ugliness is revealed. Is there no hope then? True it is that we are all slaves of Maya, born in Maya, and live in Maya.

Is there then no way out, no hope? That we are all miserable, that this world is really a prison, that even our so-called trailing beauty is but a prison-house, and that even our intellects and minds are prison-houses, have been known for ages upon ages. There has never been a man, there has never been a human soul, who has not felt this sometime or other, however he may talk. And the old people feel it most, because in they are the accumulated experience of a whole life, because they cannot be easily cheated by the lies of nature. Is there no way out? We find that with all this, with this terrible fact before us, in the midst of sorrow and suffering, even in this world where life and death are synonymous, even here, there is a still small voice that is ringing through all ages, through every country, and in every heart: & quot;

This My Maya is divine, made up of qualities, and very difficult to cross. Yet those who come unto Me, cross the river of life." & quot; Come unto Me all ye that labor and are heavy laden and I will give you rest." This is the voice that is leading us forward. Man has heard it, and is hearing it all through the ages. This voice comes to men when everything seems to be lost and hope has fled, when man's dependence on his own strength has been crushed down and everything seems to melt away between his fingers, and life is a hopeless ruin. Then he hears it. This is called religion.

❑ ❑ ❑

# THE CHIDAKASHA GITA OF BHAGAWAN NITYANANDA OF GANESHPURI

## With Commentary by Sadguru Kedarji

9. In Pranayama, Pooraka is drawing up the breath. Kumbhaka is retaining the breath. Rechaka is exhaling the breath. These three kinds of breath are from within. Nothing is taken from outside.While thus the practice is going on, the Prana will move only in one nerve. We then feel the internal joy. Who can describe this Brahmananda? The outside world will then be forgotten. We will then be in the world beyond.

**Commentary :** Pranayama is a specific meditation technique that involves instruction in how to direct the breath into the central nerve, also known as the subtle body or Sushumna Nadi. This central channel is one of three, primary channels in the body. Pranayama is a technique that involves Pooraka, the inward/downward breath and, Rechaka, the upward/outward breath (also called Prana), and the retention of breath while focusing on the pause or space between the breaths. When instructed properly, this movement of breath is directed inside the Sushumna and, while continuing to move, remains in Sushumna Nadi. While the breath moves in the central nerve, no breath is taken from outside. In this way, Kundalini Shakti moves upward through all the Chakras in the subtle body and enters the heart space (Chidakasha) reflected in the head. When this occurs, the yogi experiences a profound sense of peace and joy and remains focused inside himself, with no consciousness of the outside world. This is the world beyond, the world of the Supreme Principle.

10. ‘This world‘ means Jivatman. The ‘next world‘ means the union of Jivatman and Paramatman.

**Commentary :** The Jiva or Jivatman is the individual bound soul who creates endless karmas out of ignorance of the Truth. This world - appearance is the realm or plane of the Jiva. It exists for the sport of Shiva that is a Play of Divine Consciousness in which these karmas are being worked out as part of the free evolution of beings. The ‘next world‘ is the world in which the Jiva becomes Shiva by merging her individual, limited identity with the Divine Consciousness of Shiva - Shakti, with the Absolute that is Paramatman or Paramashiva. This union is the ‘next world.‘

11. Just as small rivers enter the sea, our attention must be fixed on the internal breath.

**Commentary:** Every river eventually merges with the ocean. In the same way, every person will, eventually have to retrace his/her steps back to God. The internal breath is the means. The internal breath is the movement of Prana inside the Sushumna Nadi. Through internal breathing or ‘Sushumna breathing,‘ Kundalini Shakti is channeled into the Sahasrar. When our attention is focused on internal breathing, individual consciousness is united with God and, just as the small rivers enter the sea, our limited identity is merged in the ocean of Divine Consciousness.

❑ ❑ ❑

## Tera (13) Saath (7)
# Annapoorna Gurumauli

**- Late Shri Uday Koppikar, Dadar, Mumbai**

I was working in National Grindlays Bank. In the year 1998 I was transferred to Ahmedabad to set up a new branch. Although I had taken the charge, I did not know the local language or anything in Ahmedabad but keeping full faith in H. H. Parijnanashram Swamiji I took up the challenge saw to it that our branch was very successful.

Local Committee members met me and requested me to host H. H. Parijnanashram Swamiji's punyatithi programme in my house as it was very big. I told them that I stayed alone and I do not have sufficient utensils to prepare even a tea for large gathering. After thinking a lot I told the Local Sabha President Mr. Kalbag that I am ready to host the program and also serve a dinner to the people present since I will he meeting them for the first time. I asked him how many people usually attend such function. He said about 35/40 people will be there. So I made the arrangements for food supply from outside for about 40 people. People started coming and Bhajan started at around 7.00 p.m. and at 8.30 dinner was also ready. To the surprise of everyone nearly 90 people had gathered. I was in a state of panic. I sat in front of Swamiji's photo and prayed to Him. After the Bhajan program ended at about 9.15, we kept the dinner on the table and I requested all to help themselves and I was continuously praying to Swamiji for his help. After everyone had dinner all were about to go home. They came to me and told me the dinner was good and they had eaten to their hearts content. After everybody ate and left, there was still food sufficient for about 5 more !! Is it not Swamiji's Krupa ? He saw to it that everyone present gets enough food. He saved me from the possible embarrassment.

During the Bhuj earthquake I was staying in a 10 storey building which was swaying like a pendulum and I was the first person along with my sepoy to come out of the building. There were lot of casualties in that disaster. I still remember the days of staying in the car/garden for nearly 5 days. After that incident I shifted to another house. Jai Parijnan !

❑ ❑ ❑

# श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची अमृतवाणी

## 'राम कर्ता' या भावनेने समाधान मिळते.

पहाटेची वेळ खरोखर फार चांगली. ह्या वेळी कोणी मानसपूजा करीत असतील तर फारच उत्तम. दुसरे कोणी या वेळी झोपेत असतील, तर आणखी कोणी मनोराज्येही करीत असतील. पहाटेपासून तो रात्रीच्या झोपेपर्यंत, मग तो राजा असो किंवा रंक असो, सर्वांची एकच धडपड चालू असते, आणि ती म्हणजे समाधान मिळवायची. प्रत्येकाच्या जीवनाला समाधानाची ओढ लागलेली असते. वास्तविक, खरे समाधान हे कशावरही अवलंबून नाही. ते 'राम कर्ता' ही भावना बाळगल्यानेच मिळू शकते. समाधान मिळवायचे एक अत्यंत सोपे साधन सर्व संतांनी स्वतः अनुभव घेऊन आपल्याला सांगितले आहे, आणि ते म्हणजे नामस्मरण. खरी तहान लागली म्हणजे सहजपणे कोणत्याही नदीचे पाणी प्याले तरी तहान भागते. त्याचप्रमाणे खरी तळमळ असली, म्हणजे सहजपणे नामस्मरण होऊन समाधानाची प्राप्ती होते. पहाटेच्या वेळी केलेला अभ्यास चांगला होतो असे म्हणतात. तेव्हा या नामस्मरणाच्या अभ्यासाला आपण पहाटेपासून सुरूवात करू या. काकड आरती झाली म्हणजे देवाचे स्मरण संपवावे असे नाही, किंवा सारखी काकड आरतीच करावी असेही नाही. भगवंताचे अखंड स्मरण आणि भाव पाहिजे, यात सर्व काही आले. मला खात्री आहे, तुम्ही आवडीने आणि तळमळीने हा अभ्यास चालू ठेवाल, तर राम तुमचे कल्याण करील.

नाम घेत असताना इतर विचार मनात येत राहतात, अशी सर्वांचीच तक्रार आहे, परंतु असे पाहा, एखादा मनुष्य रस्त्याने चालला असला की, 'तुला रस्त्यात कोण कोण भेटले ?' तर तो म्हणतो, 'माझे लक्षच नव्हते.' त्याप्रमाणे आपण नाम घेत असताना या विचारांकडे दुर्लक्ष करावे. त्यांच्या पाठीमागे जाऊ नये, किंवा त्यांच्याबद्दल विचार करीत वेळ फुकट घालवू नये. 'मला विचार विसरला पाहीजे, विसरला पाहीजे,' असे म्हणून का त्याचे विस्मरण होणार आहे ? नामाकडेच जास्त लक्ष द्यावे, म्हणजे विचारांचा आपोआप विसर पडतो, आणि पुढे ते येईनासे होतात.

एकदा वाट चुकल्यावर ती चुकीची वाट परत उलट दिशेने चालावी लागते; आणि मग योग्य रस्ता आल्यावर त्या रस्त्याला लागायचे, हाच अभ्यास; आणि हे सर्व ध्येय गाठेपर्यंत चालू ठेवणे हीच तपश्चर्या, ब्रम्हानंदबुवांनी खरी तपश्चर्या केली. ते एवढे विद्वान, परंतु त्यांनी आपली सर्व बुद्धी रामचरणी लावली. जगातल्या इतर गोष्टींपेक्षा हे केल्याने आपले खचितच कल्याण होईल असे वाटले, म्हणून त्यांनी हा मार्ग पत्करला, आणि त्याला सर्वस्वी वाहून घेतले. तेव्हा, मोठे साधक ज्या मार्गाने गेले त्या मार्गाने आपण संशयरहित होऊन चालावे, त्यात आपले कल्याण आहे.

नामात राहा आणि राम कर्ता ही भावना दृढ करते.

❑ ❑ ❑

## प्रसिद्धीपासून दूर राहिलेले महान संत – नीला बलसेकर

# संत कवयित्री जनाबाई

तेराव्या शतकाचा म्हणजे सातशे वर्षां पूर्वीचा काळ. यादवांची राजवट संपली आणि यवनी राज्य सुरू झाले होते. जुलमी सुलतानशाही, रोगराई, गरिबी आणि कर्मठपण्याच्या आसुडांनी प्रजा हवालदिल झाली होती. म्हणुनच की काय परमेश्वराने अनेक संतांच्या रूपाने जन्म घेतला व त्रस्त झालेल्या जनतेला दिलासा दिला, आधार दिला. भागवत धर्माची व वारकरी संप्रदायाची सुरुवात झाली. जात–पात गरीब–श्रीमंत सारे भेदभाव विसरून भाळी बुक्का लावून एकमेकांच्या पायी पडायचे. कुणी उच्च नाही, कुणी नीच नाही, सारी परमेश्वराची लेकरे ! भक्त वत्सल पांडुरंगाच्या भक्ती प्रेमानं वेडी झालेली ही वारकरी मंडळी भजन, अभंग गात दिंडीच्या दिंडी घेऊन पंढरपुरात येऊ लागली.

आजच्या सारख्या सोयी नव्हत्या तरी भगवंताच्या ओढीने पाऊस वाऱ्याची तमा न बाळगता 'विठ्ठल विठ्ठल जय हरि विठ्ठल' या गजरात शेकडो दिंड्या हजारो वारकरी पंढरपुरात लोटत होते.

त्यातच एक गोजिरवाणी मुलगी आई कुरुंड  व वडील दमा यांच्याबरोबर आली होती. गंगाखेडहून विठ्ठलाच्या पायापाशी नवस पूर्ण करण्यासाठी हे कुटुंब आले होते.पोटी मूल नाही म्हणून विठ्ठलाला नवस बोलून आळवणी केल्यावर पांडुरंगाने स्वप्नात दृष्टांत दिला, 'तुमचे नाव उज्वल करणारी कन्या तुमच्या पोटी जन्माला येईल.' आणि जनाचा जन्म झाला.

पंढरीत आल्यावर तेथील अबीर बुक्का, अष्टगंध आणि वैजयंती तुळशीच्या दरवळणाऱ्या परिमळाने व विठ्ठल विठ्ठलच्या नामघोषाने जनी देहभान विसरून गेली. कुणी म्हणते की ती हट्ट करून पंढरीतच एकटी राहिली. तर कुणी म्हणते की आई–वडील पटकीने दगावले किंवा विठ्ठलाने दिलेले हे लेकरू त्यालाच अर्पण करून गंगाखेडला निघून गेले. पण एवढे खरे की जनी पंढरीत आली ती तिथेच कायम राहिली. देवळाच्या पायरीवर रडत बसलेल्या या अनाथ जनीला दामाशेठनी म्हणजे नामदेवांच्या वडिलांनी आपल्या घरी नेले. तिथेच ती लहानाची मोठी झाली.

नामदेवांना तिने गुरु मानले. पण विठोबा तिचा मातापिता, सहचर सारे काही होता. नामदेव शिंपी, त्यांच्या घरची परिस्थिती देखील बरी होती. चौदा जणांचे भले मोठे कुटुंब त्यात ही पोरगी जनाबाई सामावून गेली. त्या कुटुंबाची सेवा करता करता तिने जन्म काढला. नामदेवाच्या घराशेजारी खोपट्यात ती राहायची, पहाटेपासून रात्रीपर्यंत कामाला जुंपलेली असायची. मायबाप नाही की पती व मुले नाहीत, सारे काही तो पांडुरंग, त्याचीच आळवणी करता करता कामे चालायची. पण इतके सारे विठूचे वेड असले तरी तीला देवळात प्रवेश मात्र नव्हता.

आपल्याच हातून काहीतरी पातक घडल्यामुळे देवळात प्रवेश नाही असे वाटून ती म्हणते : आम्ही पातकांच्या राशी । आलो तुझ्या पायापाशी ।।

मना येईल ते तू करी । आता तारी अथवा मारी ॥

जनी म्हणे सृष्टीवरी । एक असशी तू बा हरी ॥

जनी जरी देवळात जाऊ शकली नाही तरी पांडुरंग या वेड्या जनीच्या भेटीला रोज येत असे ! दळणकांडण, धुणी एवढेच काय पण शेणाच्या गोवऱ्या थापतानासुद्धा त्या विठ्ठलाचे नामस्मरण चाले. रोजचीच कष्टाची कामे ती, पण विठोबाच्या निरंतर नामस्मरणाने तिचे कष्ट तर हलके होतच पण केलेल्या कामावर देखील एक आगळी झिलाई चढायची !

कबीरदास काशीहून नामदेवांना व इतर संतांना भेटण्यासाठी पंढरीत मुद्दाम आले. नामदेवांना व त्यांच्या विठूवेड्या जनाबाईला भेटायला त्यांच्या घरी गेले. बाहेर माळावर जनाबाईचे शेजारणी बरोबर कडाक्याचे भांडण चालले होते. शेजारणीने जनीच्या गोवऱ्या चोरल्या होत्या. कबीरदासांना मोठे आश्चर्य वाटले ही बाई विठ्ठलाची भक्त म्हणवते आणि साध्या गोवर्यांसाठी एवढे मोठे भांडण. लोक भांडण सोडवायला आले, तेव्हा जनाबाई म्हणाली, 'या गोवऱ्या साध्यासुध्या नाहीत, त्यातून 'विठ्ठल विठ्ठल' नाद ऐकू येतो, पहा कानाला लावून हवं तर !' आणि खरेच गोवऱ्या कानाला लावल्या असता त्यातून 'विठ्ठल विठ्ठल' असा नाद ऐकू आला. शेजारणीने निमूटपणे गोवऱ्या परत केल्या ! धन्य ती जनाबाई जिने सतत नामस्मरणाने, मोठ-मोठ्या योग्यांना सुद्धा हुलकावणी देणाऱ्या पांडुरंगाला आपल्या भक्तीने व सतत चालणाऱ्या नामस्मरणाने आपल्या हृदयात बंदिस्त करून ठेवला !

धरिला पंढरीचा चोर, प्रेमे बांधुनिया दोर।।धृ।। ०हृदय बंदी रवाना केला, आत विठ्ठल कोंडीला । शब्द केले जडाजडी, पायी विठ्ठलाची बेडी ।।१।। सोहम् शब्द नाद केला, विठ्ठल काकुळतीला आला । जनी म्हणे बा विठ्ठला, विठ्ठला, जनी म्हणे बा विठ्ठला, जीवे सोडी न मी तुजला ।।२।।

भक्तीप्रेमाच्या दोराने विठ्ठलाला हृदयात कोंडून ठेवला आहे । विठ्ठल विठ्ठल या सतत जपाने विठ्ठलाचा पायच निघत नाही. 'सोहम' म्हणजे त्या भगवंतात एकरूप झाल्यावर विठ्ठल भक्ताला सोडून जाऊच शकत नाही. अगदी जीवनाच्या अंतानंतरसुद्धा!

खडतर आयुष्य वाट्याला आले तरी प्रभू नामात रंगलेल्या जनीला त्या कष्टाचे काही दुःख नव्हते.

नाम्याचे ठेवणे जनीस लाभले ।  धन सापडले विटेवरी ।।

धन्य माझा जन्म, धन्य माझा वंश । धन्य विष्णुदास नाम्या स्वामी माझा ।।

हीन कुळात जन्मास येऊन या थोर संत कवयित्रीने स्वतःचा जन्म, कुळ साऱ्याचे सोने केले. स्वतःसाठी तिने पांडुरंगापाशी काहीच मागितले नाही. शेवटपर्यंत ती नाम्याची दासीच राहिली. कष्टाची कामे करीतच तिने भक्तीचा वसा चालविला, म्हणूनच की काय तो पांडुरंग तिचे कष्ट हलके करण्यासाठी वारंवार धावत येत असे. विठ्ठलाने जनीने कष्ट करताना तिच्यासोबत दळणकांडण केले एवढेच नाही तर जनीच्या घराचे छप्पर वादळात उडून गेले ते पांडुरंगाने घालून दिले. विठाबाई बनून या पोरक्या पोरीला न्हाऊ भरवू घातले.

कर्मकांड व पूजा पाठाच्या जाळ्यात न अडकता फक्त नामस्मरण स्वतःची कामे करता करता प्रभूचे गुणगान व चिंतन करून परमेश्वराशी जनाबाई पूर्ण एकरूप झाली. भक्तीमार्गातून प्राप्त झालेले अद्वैताचे ज्ञान किंवा जाणीव ही अगदी मुळापर्यंत, कणाकणातून रुजलेली असते.

❑ ❑ ❑

# Chidakash Gita

12. What is visible is transient. It is perishable. When the mind is merged in “Bindu” and “Nada,” Nirvikalpa Samadhi is attained. Our attention is then entirely towards Ananda (eternal joy). Fixing the attention between the eyebrows, the Prana should enter the holy Brahmarandhra. Here the light of lights becomes visible to the divine eye. This is Mukti. This is eternally supreme joy. This is the place where the Manas ought to dwell. This is the eternal being whence the Vedas have sprung. This is seeing Paramatman in all. This is the real place of Jivatman.

**Commentary:** This world-appearance is transient and temporary. It is perishable because it is an illusion of Maya. When the mind is merged in Bindu-Nada, the firm point of sound that is the Vibration of Divine Consciousness in the Crown Chakra, all thoughts cease, the notion of a world is erased and Nirvikalpa Samadhi is the result. Our attention is then turned entirely within and we experience our own Bliss, our own eternal Joy. By fixing one’s attention on the command center of the third eye, known as Ajna Chakra, with the proper instruction from a Sadguru, one can direct the exhalation of the breath (Prana) upward into the Crown Chakra in the head. Here there is the light of a thousand suns that is visible inside one’s own being. This is Liberation. This is where endless Supreme Joy can be tasted. A yogi should keep his mind one-pointed on this inner Light and sound. It is from this perfect state that the Vedas and all sacred texts have been realized. This is the state where one sees God in everything and everyone, everywhere. This is where the Jiva should travel and roam.

13. The real place of Jiva is formless, indivisible. God pervades all things movable and immovable. He is the ONE without a second. God is the origin of Vedas. He is the Lord of the body. He is the Lord of Jivanmukti. Man, to be man, must meditate upon God.

**Commentary:** In truth, the Jiva does not exist. Jiva is an illusion since it is Shiva, the formless God himself, who takes the form of the Jiva. Nothing exists anywhere that is not Shiva. God pervades all things sentient and insentient. Shiva is the ONE without a second. He is the origin of the Vedas and all other scriptures and sacred texts. All forms belong to Him, including the body that is on loan from that Supreme Being. Shiva is the Lord of Liberation, the place of deliverance. Human Beings, to be human, must meditate on Shiva.

❑ ❑ ❑

# संत कबीरजी के दोहे
# और उनका हिंदी अनुवाद -१२

**कहत सुनत सब दिन गए, उरझि न सुरझ्या मन।**
**कही कबीर चेत्या नहीं, अजहूँ सो पहला दिन।**

**अर्थ:** कहते सुनते सब दिन निकल गए, पर यह मन उलझ कर न सुलझ पाया। कबीर कहते हैं कि अब भी यह मन होश में नहीं आता। आज भी इसकी अवस्था पहले दिन के समान ही है।

**कबीर लहरि समंद की, मोती बिखरे आई।**
**बगुला भेद न जानई, हंसा चुनी–चुनी खाई।**

**अर्थ:** कबीर कहते हैं कि समुद्र की लहर में मोती आकर बिखर गए। बगुला उनका भेद नहीं जानता, परन्तु हंस उन्हें चुन–चुन कर खा रहा है। इसका अर्थ यह है कि किसी भी वस्तु का महत्व जानकार ही जानता है।

**जब गुण को गाहक मिले, तब गुण लाख बिकाई।**
**जब गुण को गाहक नहीं, तब कौड़ी बदले जाई।**

**अर्थ:** कबीर कहते हैं कि जब गुण को परखने वाला गाहक मिल जाता है तो गुण की कीमत होती है। पर जब ऐसा गाहक नहीं मिलता, तब गुण कौड़ी के भाव चला जाता है।

**कबीर कहा गरबियो, काल गहे कर केस।**
**ना जाने कहाँ मारिसी, कै घर कै परदेस।**

**अर्थ:** कबीर कहते हैं कि हे मानव ! तू क्या गर्व करता है ? काल अपने हाथों में तेरे केश पकड़े हुए है। मालूम नहीं, वह घर या परदेश में, कहाँ पर तुझे मार डाले।

**पानी केरा बुदबुदा, अस मानुस की जात।**
**एक दिना छिप जाएगा,ज्यों तारा परभात।**

**अर्थ:** कबीर का कथन है कि जैसे पानी के बुलबुले, इसी प्रकार मनुष्य का शरीर क्षणभंगुर है।जैसे प्रभात होते ही तारे छिप जाते हैं, वैसे ही ये देह भी एक दिन नष्ट हो जाएगी।

**हाड़ जलै ज्यूं लाकड़ी, केस जलै ज्यूं घास।**
**सब तन जलता देखि करि, भया कबीर उदास।**

**अर्थ:** यह नश्वर मानव देह अंत समय में लकड़ी की तरह जलती है और केश घास की तरह जल उठते हैं। सम्पूर्ण शरीर को इस तरह जलता देख, इस अंत पर कबीर का मन उदासी से भर जाता है।

❑ ❑ ❑